अति.महा. आयुक्त (ज) कार्यालय
आस्थापना विभाग, पुणे मनपा.
जा.क्र. अतिमआ/साप्रवि/आस्था/ ६६६४
दिनांकः- १८/०३/२०२०

-: **कार्यालयीन आदेश** :-

विषय :- <u>कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपायाबाबत.</u>

संदर्भ :- १) साथरोग अधिनियम १८९७ ची अमलबजावणी सुरु झाल्याबाबतची अधिसूचना दि.१३.०३.२०२०.
२) महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम,२०२०.
३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५
४) दि. १४.०३.२०२० रोजी विभाग प्रमुख COVID-19 CONTAINMENT PLAN बाबतची झालेली माहिती.
५) मा. विभागीय आयुक्त, परिपत्रक दि. ०९.०३.२०२०.

पुणे शहरात सध्या कोरोना विषाणू प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहे. यातही प्रामुख्याने संशयीत रुग्णाच्या घरात विलगीकरणाच्या दृष्टीने खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी,

१. विमानतळावरील प्राप्त झालेल्या यादी मधील प्रवाशांची पुणे महानगरपालिकेच्या विलगीकरण कक्षातून तपासणी झाल्या नंतर अशा व्यक्तींची यादी त्यांनी आपत्ती व्यवस्थापन कक्ष आणि डॉ. वैशाली जाधव, सहाय्यक वैद्यकीय अधिकारी यांचे कडे पाठवावी.
२. सदरची यादी प्राप्त झाल्यावर आपत्ती व्यवस्थापन कक्षाने सलग चौदा दिवस दररोज किमान ३ वेळेस दूरध्वनीद्वारे संबंधित रुग्णास संपर्क साधून त्याच्या प्रकृती बद्दल चौकशी करावी. चौकशी मध्ये जर कोरोना व्हायरस ची लक्षणे दिसत आहेत असे लक्षात आल्यावर तत्काळ त्यास पुणे महानगरपालिकेच्या डॉ. नायडू रुग्णालयात आणून त्याची तपसणी होईल असे पहावे. तपासणी अंति कुठल्याही प्रकारचे कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही असे लक्षात आल्यानंतरच संशयीत रुग्णाबरोबरची दैनंदिन माहिती (Feedback) घेणे बंद करावे.
३. डॉ. वैशाली जाधव, सहाय्यक वैद्यकीय अधिकारी यांनी पुणे महानगरपालिकेच्या विलगीकरण केंद्रातून प्राप्त झालेल्या यादीच्या अनुषंगाने संबंधित प्रवाशांच्या निवासस्थानी व आजूबाजूच्या परिसराच्या घरात १% सोडियम हायपो क्लोराईडच्या द्रावणाने फवारणी करून घेण्यात यावी.

या सर्व बाबींची माहिती संबंधितानां व संबंधित प्रभागाचे सहाय्यक महापलिका आयुक्त व क्षेत्रिय आयुक्त यांना वेळोवेळी देण्यात यावी.

Rubal 18/3/2020

(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रत -
मा.महापालिका आयुक्त,
मा.अतिरिक्त आयुक्त (वि) यांना माहितीस्तव.
प्रती –
संबंधीत मा. खातेप्रमुख/प्रशासन अधिकारी, पुणे महानगरपालिका